# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

<u>निवडणूक प्राथम्य</u>

क्रमांक : जीईएन (विस)-२०२४/प्र.क्र. ३७/२४/निवडणूक-२

सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल-estt-election@mah.gov.in
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२४.

प्रति,

१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर,

२. अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व), मुंबई शहर व मुंबई उपनगर,

३. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, (सर्व) (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता)

विषय : <u>महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४.</u>
जिल्हास्तरावर २४ X ७ कंट्रोल रुम स्थापन करण्याबाबत.

महोदय,

मा. भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ चा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. सदर निवडणूकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी जिल्हास्तरावर २४ X ७ कंट्रोल रुम तात्काळ स्थापन करण्यात यावा. या कंट्रोल रुमवर पुरेसे मनुष्यबळ नियुक्त करण्यात यावे व आवश्यक यंत्रणा उपलब्ध करण्यात यावी.

२. जनतेतील कोणत्याही व्यक्तीने / जागृत व्यक्तीने (Whistle blower) केलेल्या प्रत्येक तक्रारीची वेळेसह तक्रार नोंदवहीमध्ये नियंत्रण कक्षात नोंद केली पाहिजे. निवडणूक खर्चाच्या संदर्भातील तक्रारी निवडणूक अधिकाऱ्याच्या प्रतीसह तात्काळ खर्च निरीक्षकास सूचना देऊन भरारी पथकाच्या संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवावयाच्या आहेत. आदर्श आचारसंहितेशी संबंधित तक्रारीची प्रत देखील निवडणूक निरीक्षक यांना उपलब्ध करुन द्यावयाची आहे व तक्रारीवर देखील कार्यवाही करावयाची आहे. आवश्यक असल्यास सदर प्रत भरारी पथकांना त्वरीत उपलब्ध करुन देण्यात येऊन त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर नियंत्रण कक्ष सुरळीतपणे कार्यरत आहे, याबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी आणि विभागीय आयुक्त यांनी वेळोवेळी आकस्मित भेटी देऊन खात्री करावयाची आहे. तसेच सदर नियंत्रण कक्षामध्ये भेट नोंदवही देखील ठेवण्यात यावी.

आपला,

(म. स. पारकर)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

प्रत,

विभागीय आयुक्त (सर्व)